# देगलूर महाविद्यालयात पालक-शिक्षक सहविचार सभा

देशोन्नती वृत्तसंकलन

**देगलूर :** राज्य बोर्डाने ठरवून दिलेल्या अभ्यासक्रमासोबतच अभियांत्रिकी , वैद्यकीय प्रवेश पूर्व परीक्षा अभ्यासक्रमाच्या वर्गास विद्यार्थ्यांनी प्रवेश घ्यावा, असे आवाहन कोटा राजस्थान. येथून आलेले मार्गदर्शक अध्यापक जे.पी. चंद्रा यांनी केले. ते देगलूर महाविद्यालयातील अकरावी विज्ञान शाखेच्या नवप्रवेशित विद्यार्थी पालक शिक्षक सहचिंतन सभेत बोलत होते.

यावेळी अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. मोहन खताळ होते. व्यासपीठावर अडत व्यापारी शिक्षण संस्थेचे कार्यकारणी सदस्य देवेंद्र सेठ मोतेवार, विलास शेठ तोटावार, उपप्राचार्य प्रा.उत्तम कुमार कांबळे, डॉ. अनिल चिद्रावार, एस.एन. पाटील यांची उपस्थिती होती. यावेळी चंद्रा म्हणाले की, आपण निकाल व्यवस्थीत देऊ जे बाहेर, शिकविले जाते ते आपल्या गावात येऊन शिक्षण देत आहोत. याचा लाभ घ्यावा, असे आवाहन केले. यावेळी पर्यवेक्षक प्रा.एस. एन. पाटील व उपप्राचार्य उत्तम कुमार कांबळे यांनी देखील महाविद्यालयाच्या विविध उपक्रमाबाबत मार्गदर्शनपर भाषणातूनमाहिती दिली. तसेच देगलूर महाविद्यालयाचा चलचित्रद्वारे परिचय करून देणारा व्हिडिओ तयार केला. याबद्दल प्रा. महेश कुलकर्णी यांचा सत्कार करण्यात आला. अध्यक्षीय समारोपात प्राचार्य डॉ. मोहन खताळ यांनी स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन वर्ग राष्ट्रीय छात्र सेना, राष्ट्रीय सेवा योजना तसेच महाविद्यालयाने नव्याने अकरावी, बारावी विज्ञान विद्यार्थ्यांसाठी वैद्यकीय तसेच अभियांत्रिकी पूर्व प्रवेश परीक्षा अभ्यासक्रमाच्या वर्गाचे आयोजन असे विविध उपक्रमाची माहिती आपल्या मनोगतातून व्यक्त केली. सूत्रसंचालन प्रा. महेश कुलकर्णी यांनी तर आभार प्रा. डॉ. व्ही. जी. शेरीकर यांनी मानले. या कार्यक्रमास प्रा. सावळे सत्यजित, डॉ. चंद्रशेखर बाकेवाड, प्रा. डॉ. नरेंद्र मुक्तावार, प्रा. आर. सी. भुसाळे , प्रा. दत्ता पाटील, प्रा. गजानन कोकडवार, प्रा. नितीन बोरगावकर, प्रा. प्रमोद गुजे, प्रा. भुरे, प्रा. सौ शोभा वद्देवार, प्रा. सौ. निकिता ऐनलावार उपस्थित होते. (ता.प्र.)

Scanned with OKEN Scanner